**एक**
**भारत**
**श्रेष्ठ**
**भारत**
**सर्वांची साथ**
**सर्वांचा विकास**

---

**निवडणुक**
**जाहिरनामा**
**2014**
**महत्त्वाचे अंश**

---

**प्रस्तावना**

आज भारताला "**डेमोक्रेसी, डेमोग्राफी आणि डिमांड**" च्या स्वरुपात दुर्लभ अशा क्षमतांचे आणि संधींचे वरदान मिळाले आहे. जर आपण मजबूती देण्यास आणि त्यांचा सदुपयोग करण्यास सक्षम झालो, तर आपण ती उंची गाठू  शकतो, ज्याचा भारत ख-या अर्थाने हक्कदार आहे. आज देशाच्या वाईट परिस्थितीला सगळ्यात मोठी गोष्ट म्हणजे त्या लोकांचे वाईट मनसुबे आहेत ज्यांचे 60 वर्षांपासून देशावर शासन चालू आहे आणि हाच आम्ही पहिला बदल घडवून आणणार आहे. भाजपाची निती आणि त्याच्या क्रियान्वयनचा पहिला लक्ष असेलः"**एक भारत श्रेष्ठ भारत**" आणि आमचा मार्ग असेल "**सर्वांची साथ-सर्वांचा विकास**" हिच राष्ट्र आणि देशवासियांच्या प्रती असणारी आमची प्रतिबद्धता आहे. पक्षाच्या या संकल्पासोबत, श्री नरेंद्र मोदी यांच्या जादूई नेतृत्त्वामध्ये आम्ही 16 व्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये उतरत आहोत आणि आम्ही पूर्णपणे मनाने भारताला स्थायी सशक्त, दूरदृष्टीयुक्त आणि विकास आणि प्रगतीसाठी प्रतिबद्ध सरकार देण्यासाठी काम करु. आपले आणि आपल्या देशाचे भाग्य बदलण्याची हि संधी आहे.

**काय करणार आहे भाजपा देशाच्या जनतेसाठी?**
**देशच्या काना-कोप-याला विकासाने जोडणे.**

- 100 नवीन शहरे वसविणे.
- देशातील 100 सर्वात मागास जिल्ह्यांना विकसित करुन, त्यांना अन्य विकसित जिल्ह्यांच्या समान बनविणे.
- प्रत्येक व्यक्तीला आपले घर असेल जिथे वीज, पाणी तसेच शौचालयाची सुविधा असेल.
- देशभरातील गावांचा विकास करण्यासाठी ग्रामीण बाजाराचे जाळे पसरविणे आणि गावांत शहरांप्रमाणे सुविधा उपलब्ध करणे.
- कुटीर आणि लघु उद्योगात कार्यरत परंपरागत कारागीरांचे कौशल्य विकास हेतु कर्ज सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यास मदत करणे.
- एक व्यापक राष्ट्रीय ऊर्जा नीती निर्माण करणे.
- मनरेगा ला चालू ठेवून त्याला उत्पादक कार्यांशी जोडणे.
- राष्ट्रीय गॅस ग्रीड निर्माण करणे.
- राष्ट्रीय वाय-फाय नेटवर्क उभे करणे.
- बुलेट ट्रेन ची चतुर्भुज परियोजना सुरु करणे.
- कृषि उत्पादनांचे वितरण करण्यासाठी रेल्वे नेटवर्क बनविणे.
- पर्यटन रेल्वे नेटवर्क बनविणे.
- प्रत्येक घराला नळाद्वारे पाणी पुरविणे.
- स्वातंत्र्याचे 75 व्या वर्षी(2022) पर्यंत प्रत्येक परिवाराला एक पक्के घर निश्चित करणे.

**महागाई वर नियंत्रण**

- भाव वाढू नये यासाठी वेगळ्या कोषाची व्यवस्था करणे.
- साठेबाजी, काळाबाजार रोखण्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना, अपराध्यांना त्वरित दंड व्यवस्था करणे.
- भारतीय खाद्य निगमाला खरेदी, साठा आणि विपणन असे तीन विभाग करणे.

**भ्रष्टाचार निर्मुलनसाठी**

- ई-गव्हर्नस द्वारे पारदर्शकता वाढविणे.
- प्रशासन आणि नागरिक यांच्यामध्ये कार्यप्रणालीत मनमानीपणा करणा-यांना संधी न देणे.
- प्रत्येक स्तरावर प्रक्रिया आणि पद्धतीला सरलीकृत करणे- नागरिक, संस्था आणि प्रतिष्ठान यांच्यात आपसात विश्वास वाढविणे.

**रोजगाराला उत्तेजन देणे.**

- रोजगार कार्यालयांचे करियर केंद्रांच्या रुपात परिवर्तन करणे.
- उद्योग विकास आणि व्यापक कर्ज सुविधेच्य माध्यमातून रोजगार निर्माण करणे.
- रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी कपडे, बूट, इलेक्ट्रॉनिक सामान व पर्यटनाला विशेष स्वरुपात उत्तेजन देणे.
- पाच 'प'- परंपरा, प्रतिभा, पर्यटन,पण(व्यापार) आणि प्रौद्योगिकी यांच्या शक्तीच्या आधारे भारताला एका ब्रँड च्या रुपात स्थापित करणे.

**महिला - राष्ट्र निर्माती**

- मुलींना वाचविणे आणि शिकविण्यासाठी एक राष्ट्रीय अभियानः लेक वाचवा- लेक शिकवा सुरु करणे.
- बलात्कार पिडीत व ऍसिड हल्लात शिकार झालेल्या महिलांच्या कल्याणासाठी सरकार एका कोषाची निर्मिती करेल, कारण की, अशा महिलांच्या उपचारासाठी तसेच त्यांच्या कॉस्मेटीक सर्जरीचा मेडीकल खर्च उचलणे शक्य होईल.
- पोलिस स्टेशन महिलांसाठी अनुकून बनविले जाईल आणि विभिन्न स्तरांवर पोलिस खात्यात महिलांची संख्या वाढविली जाईल.
- महिलांना विशेष कौशल्य प्रशिक्षणासाठी व्यवसाय प्रशिक्षण पार्क बनविले जाईल.
- महिलांसाठी विधान सभा आणि लोकसभेत 33 टक्के आरक्षण देण्यास प्रतिबद्धता.

**एससी/ एसटी/ ओबीसी/ वर्ग- सामाजिक न्याय आणि सशक्तीकरण**

- भाजपा प्रत्येक स्तरावर शिवाशिव आणि अस्पृश्यता नाहिशी करण्यासाठी संकल्पबद्ध आहे.
- असे वातावरण तयार केले जाईल ज्यामध्ये

एससी/ एसटी/ ओबीसी/ वर्गासह अन्य गरिब टप्प्यांना प्राथमिकतेच्या आधारे शिक्षण आणि उद्योग लावण्यासाठी संधी दिली जाईल.

• भाजपा निश्चीत करेल की एससी/ एसटी/ओबीसी/ वर्गासाठी ज्या फंडाची व्यवस्था केली गेली आहे, त्याचा योग्य आणि चांगल्या प्रकारे उपयोग होत व्हावा.

• या वर्गातील लोकांना घर, शिक्षा, आरोग्य आणि कौशल्य विकासासाठी एक मिशन चालविला जाईल.

**आदिवासींसाठी** घर, पाणी, वीज, शिक्षण आणि आरोग्य यांसारखी सुविधा प्रदान करणे आणि त्यांना विस्थापित होण्यापासून वाचविणे.

**अल्पसंख्याक- समान संधी**

• अल्पसंख्यक शैक्षणिक व्यवस्था आणि संस्थानांना सशक्त तसेच आधुनक बनविले जाईल. राष्ट्रीय मदरसा आधुनिकीकरण कार्यक्रम प्रारंभ केला जाईल.

**सीमा क्षेत्रांवर विशेष लक्ष**

• उत्तर पूर्व राज्यांना पश्चिमी क्षेत्रांच्या बरोबर आणणे.

• उत्तर पूर्व राज्यांसाठी बनविण्यात आलेल्या मंत्रालयाचे सशक्तीकरण करणे.

• काश्मीरी पंडितांना त्यांच्या प्रदेशात जम्मू-काश्मीर मध्ये सन्मानाने परत जाण्यासाठी पावले उचलणे आणि प्रदेशात सुशासन स्थापित करणे.

• कलम 370 ची समाप्ती.

**दहशतवादाविरोधात**

• दहशतवाद विरोधी व्यवस्थेला पुन्हा अंमलात आणून, एनआयएची भुमिका मजबूत बनविणार. दहशतवाद्यांच्या संबंधित सुनावणीसाठी खास सिस्टम आणणार. दहशतवाद संलग्न माहितीच्या मुल्यांकनासाठी खास केंद्र बनविण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा परिषदेत सुधारणा करणार.

गुप्तचर माहिती एकत्र करण्याची सिस्टम सुधारुन त्याला संपूर्णपणे आधुनिक बनविण्यात येईल.

**वरिष्ठ नागरिकांचे जीवन सहज-सोपे करणे**

• वरिष्ठ नागरिकांना आर्थिक साहाय्य देण्यात येईल. त्यांना करात सवलत दिली जाईल तसेच त्यांच्या गुंतवणूकीला मोठे व्याजदर दिले जाईल.

**विकलांगांसाठी**

• विकलांग व्यक्तींसाठी खास बील आणले जाईल. संपूर्ण देशात प्रत्येक विकलांग व्यक्तींच्या ओळखीसाठी वेब आधारित अपंगता नोंदणी सिस्टम राबविली जाईल.

**युवापिढीला मदत केल्यास भारत सक्षम बनेल.**

• राष्ट्रीय युवा सल्लागार परिषद स्थापून 'विकासासाठी युवा' नावाचा खास कार्यक्रम सुरु करण्यात येईल.

• नावीन्य आणि साहसिकतेला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हा स्तरावर अंमल आणि उत्प्रेरक कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर हाती धरला जाईल.

- खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी“**राष्ट्रीय क्रीडा प्रतिभा शोध प्रणाली”** चा प्रारंभ केला जाईल.

**भारताच्या नागरिकांना आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी**

- सर्व भारतीयांच्या खिशाला परवडेल इतक्या कमी किंमतीमध्ये आरोग्यसेवेची खात्री.

- आरोग्य सेवेला सुदृढ करण्यासाठी मोबाईल फोनचा सर्वव्यापक फ्लॅटफॉर्मचा उपयोग करण्यात येईल आणि नॅशनल ई-हेल्थ अथॉरिटी स्थापन करण्यात येईल.

- प्रत्येक राज्यात एम्स सारखी एक आरोग्य संस्था देणे

- 2019 मध्ये गांधीजींच्या 150 व्या जयंती निमित्त ‘स्वच्छ भारत’ कार्यक्रम सुरु करणार.

**टॅक्स प्रणालीत सुधार**

- टॅक्स प्रणालीचे सरलीकरण करणे आणि त्यांना न्यायसंगत बनविणे.

**कृषि उत्पादक, वैज्ञानिक आणि पुरस्कृत करणे**

- शेतक-यांना त्यांच्या खर्चाच्या कमीत कमी 50 टक्के नफ्याची खात्री मिळेल अशी व्यवस्था करणे.

- प्रादेशिक किसान टीव्ही चॅनेल, एपीएमसी कायद्यात सुधारणा करणे, पीक वीमा योजना अंमलात आणणे.

- जमीन वापरण्यासाठीची राष्ट्रीय नीतीचा अवलंब करणे.

**उद्योगांना अत्याधुनिक आणि स्पर्धात्मक बनविणार**

- भारतात व्यापाराल सरळ बनविण्यासाठी अनुकूल आणि सक्रिय वातावरणाची निर्मिती करण्यात येईल.

- देशभरातील उद्योग, विशेषतः छोटे आणि मध्यम उद्योगांसाठी लॉजिस्टीक आणि वीजेसारखी सुविधा सुलभ बनविणे.

- मल्टी ब्रांड किरकोळ व्यापारात विदेशी गुंतवणूकीची अनुमती नाही.

- किरकोळ विक्रेते, लहान व्यापारी आणि विक्रेत्यांच्या हितांची रक्षा करण्यासाठी सर्वप्रकारची आवश्यक पावले उचलणार.

**गावांच्या विकासासाठी**

- गावांना प्रत्येक ऋतूच्या अनुकूल रस्त्यांनी जोडणे.

- पंतप्रधान ग्राम सिंचन योजनेच्या माध्यमातून प्रत्येक शेताला पाणीपुरवठा देणे.

**असंघटीत क्षेत्रासाठी**

- असंघटीत क्षेत्रात कार्यरत श्रमिक वर्गासाठी ओळख पत्र, श्रमिक बँकेची स्थापना, पेंशन आणि आरोग्य वीमा योजना सुरु करणे.

- वीणकर आणि कारागीरांसाठी विशेष लक्ष
- कारागीर, लोहार, वीणकर, केश-कर्तक, चर्मकार आणि कुंभार आदींसह मच्छीमार समुदायाला कौशल विकासासाठी व त्यांच्या व्यवसायाला अधिक कुशल संधी प्रदान करण्यासाठी नव्या योजना बनविल्या जाणार.

**माजी सैनिक**

- माजी सैनिकांच्या समस्यांच्या सुनावणीसाठी माजी सैनिक आयोगाची स्थापना केली जाईल.
- माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना(ईसीएचएस) मध्ये सुधार तसेच माजी सैनिकांचे पुनर्रोजगार या आयोगाच्या कार्यक्षेत्रात होतील.
- **'एक रँक- एक पेंशन'** योजना लागू केली जाईल.

**अन्य नोंदपात्र पावले**

- सांस्कृतिक महत्वाशी संबंधित असलेले जसे हिमालय, रेताड प्रदेश, सागरी किनारे तसेच प्राकृतिक चिकित्सेवर आधारित 50 पर्यटन सर्कीट बनविणार
- क्षेत्रीय भाषांना प्रोत्साहन तसेच सर्व भाषांच्या रेकॉर्डसचे डिजीटिलायझेशन करणार
- एक राष्ट्रीय कौशल्य मिशन स्थापन करणार
- लोकसंख्या स्थिरीकरणाला एक राष्ट्रीय मिशन कार्यक्रमाच्या रुपात चालू करणार.

**भारतीय संस्कृति आणि परंपरेचे जतन**

- संविधानाच्या कक्षेतून राममंदिराची निर्मिती करण्यासाठी सर्व पर्यायांना तपासले जाईल.
- रामसेतु, सेतु-समुद्रम चॅनेल परियोजनेवर निर्णय घेताना आपल्या सांस्कृतिक परंपरेचे अंग असणे आणि थोरियम भंडारांच्या तथ्यांना समोर ठेवले जाईल.
- गाय आणि गोवंशाची रक्षा केली जाईल.
- गंगा निर्मळ आणि तिचा प्रवाह निरंतर तसेच सर्व प्रमुख नद्यांची स्वच्छता राखली जाईल.
- सर्वश्रेष्ठ परंपरेने प्रेरित आणि संविधानाच्या भावनेनुसार समान नागरिक संहिता.

**संस्थाकिय सुधारणा**

- पंतप्रधान कार्यालयाच्या अंतर्गत एका संस्थेची स्थापना करुन प्रशासनिक सुधार
- एक प्रभावशाली लोकपाल बनविणे, तसेच इ-ग्राम आणि विश्वग्राम कार्यक्रम सुरु करणे.
- न्यायालयांची संख्या दुप्पट करण्याचे लक्ष साधणे व फास्ट ट्रॅक न्यायायल स्थापित करणे.

सरकारची एकमात्र विचारधारा- 'सर्वप्रथम भारत'
एकमात्र धर्मग्रंथ- 'संविधान'
एकमात्र शक्ति- 'जनशक्ति'
एकमात्र प्रार्थना- 'जनतेची भलाई'
एकमात्र मार्ग- 'सर्वांची साथ- सर्वांचा विकास'
आमचा संकल्प
पारदर्शी सरकार, जबाबदार सरकार

जनकेंद्रीत आणि जनप्रेरित नीति
**भाजपाला आणा देशाला वाचवा**
**आता येणार मोदी सरकार**